**“ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र ” अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून कुशल खर्च व साधन सामग्री करीता प्राप्त केंद्र निधी वितरीत करणेबाबत.....”**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्रमांक : मग्रारोहयो - २०२६/प्र.क्र.११९/रोहयो-७**
**नियोजन विभाग (रोहयो प्रभाग),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २६ मे, २०२६**

**वाचा :-** १) ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार यांचे पत्र क्र. F.No.J-14022/01/2026-RE-I (396160) SI No.16 दिनांक. 30/04/2026

२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण -१०१८/प्र.क्र.४६/ अर्थोपाय दिनांक.०५/१२/२०२३

३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक - अर्थसं - २०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३ दिनांक.०७/०४/२०२५

४) नियोजन (रोहयो) प्रभाग पत्र क्रमांक - मग्रारो-२०२५/प्र.क्र.१७७/रोहयो ७/९७ दिनांक. १६/१०/२०२५

५) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४ दिनांक. ३०/०७/२०२५

६) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक - अर्थसं - २०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दिनांक.०७/०५/२०२६

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने वाचा १ येथील पत्रान्वये महाराष्ट्र राज्यास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी कुशल खर्च व साधन सामग्री या बाबींसाठी रक्कम रु.४४६,९६,४७,०००/- (रक्कम रु. चारशे सेहचाळीस कोटी शहाण्णव लाख सत्तेचाळीस हजार रुपये) निधी राज्यास वितरीत करण्याबाबत अधिदान व लेखा अधिकारी, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय यांना पत्र निर्गमित केलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी कुशल खर्च व साधन सामग्री या बाबींवर खर्च करणे आवश्यक आहे. यास्तव खालील नमूद लेखाशिर्षांतर्गत प्राप्त केंद्र निधी रक्कम रु.४४६,९६,४७,०००/- (रक्कम रु. चारशे सेहचाळीस कोटी शहाण्णव लाख सत्तेचाळीस हजार रुपये) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांना खर्च करण्यास व अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) मार्फत वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्च सन २०२६-२७ या वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) ही योजना केंद्र पुरस्कृत आहे, या योजनेसाठी SNA - SPARSH प्रणाली लागु असल्यामुळे या शासन निर्णयाद्वारे वितरीत होणारा निधी सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA - SPARSH खात्यामधून खर्ची टाकावा.

**केंद्र निधी :**

**मागणी क्र. : ओ ३**

**मुख्य लेखाशिर्ष : २५०५ ग्रामीण रोजगार,०२-ग्रामीण रोजगार हमी योजना**
**१०१ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**
**(०२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी केंद्रीय अनुदाने**
**(०२) (०१) केंद्र पुरस्कृत मनरेगा योजनेअंतर्गत १०० दिवसांपर्यंत प्रत्येक कुटूंबाला मजुरी देण्यासाठी अनुदाने (१०० टक्के) आणि कुशल कामे व सामुग्री यासाठी अनुदाने (७५ टक्के) (केंद्र हिस्सा) (कार्यक्रम) २१ - पुरवठा व सामुग्री (योजनांतर्गत) (दत्तमत) (२५०५ २९७२)**

सदर कुशल निधी हा अकुशल खर्चाच्या मर्यादेत जिल्हयांसाठी वितरीत करावा. अकुशल खर्चामध्ये सामुहिक / सार्वजनिक तसेच वैयक्तिक लाभाच्या कामांचा अंतर्भाव आहे. अर्धकुशल बाबींमधील कुशल कारागीरांचा मजुरीवरील खर्च प्रथम प्राधान्याने वितरीत करण्यात यावा. तसेच, सदरचा निधी केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा. सदरील निधी ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आलेला आहे, त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात यावा. अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. तसेच वाचा ४ येथील नमुद पत्रातील

निर्देशांचे सदर रक्कम वितरीत करताना अनुपालन करणे आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांना अनिवार्य राहील.

वाचा ५ येथील शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान सायबर कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती त्वरीत संबंधित अधिकारी यांनी सहायक संचालक (लेखा), रोजगार हमी योजना, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठवावी. १) मंजूर केलेली रक्कम, २)कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक, ४)महालेखापाल कार्यालयातील रक्कमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आयुक्त (मनरेगा), नागपूर कार्यालयाला वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित नमुन्यात १५ दिवसांच्या आत केंद्र शासनास सादर करण्यात यावे व त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त व नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच, वित्त विभाग परिपत्रक दिनांक ७ एप्रिल, २०२५ व ७ मे २०२६ अन्वये दिलेल्या सुचनेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५२६१७४७४३९५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJKUNVAR SANDIP DAFALE
Date: 2026.05.26 17:48:42 +05'30'

**(राजकुंवर डफळे)**
**अवर सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर.
४. संचालक (एनआरजीए), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषी भवन,नवी दिल्ली -११० ००१.
५. उपसचिव (MGNREGA), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषी भवन, नवी दिल्ली - ११० ००१
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई, नागपूर

७. सायबर कोषागार अधिकारी, सायबर कोषागार कार्यालय, मुंबई.

८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर

९. वित्त विभाग (अर्थ-१६ , व्यय-८)

१०. नियोजन विभाग (का.१४३४ व का.१४२४)

११. निवड नस्ती, रोहयो - ७